# प्रकरण १३

रुग्णालयातर्फे देण्यात येण-या सवलती परवाने आणि अधिकार पत्रे यांची विशेष माहिती.

1. रुग्णालयामध्ये गरिबांसाठी धर्मदाय सेवा निधीची सुविधा उपलब्ध आहे.
2. गरिब व गरजु रुग्णांना आर्थिक मदत देणे हा या योजनेचा उद्देश आहे. ही योजना गरजेप्रमाणे राबविली जाते.
3. या योजनेतुन आर्थिक मदत मिळवण्याकरीता रुग्ण गरिबी रेषेच्या खाली असणे आवश्यक आहे. त्या रुगणाकडे म. वा. देसाई रुग्णालय वैद्यकिय अधिका-यांने बाहयरुग्ण/ आंतररुग्ण केसपेपरवर लिहिलेली औषधांची यादी असलेली पाहिजे.
4. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी रुग्णाने एका साध्या कागदावर समाज विकास अधिका-याकडे अर्ज करावा. यासाठी शुल्क आकारले जात नाही. रुग्णांने केसपेपरची फोटोप्रत अर्जासोबत जोडावी. समाज विकास अधिकारी रुग्ण व त्याच्या नातेवाईकांची मुलाखत घेऊन त्यावर आपला शेरा देतो व अर्ज संमतिसाठी प्रमुख वैद्यकिय अधिका-यांकडे पाठवितो. यासाठी एक दिवस लागतो.
5. गरज असलेली औषध रुग्णालयातर्फे खरेदी केली जाऊन रुग्णाला दिली जातात.
6. रुग्णालय खाजगी चाचण्यासाठीचे शुल्क थेट चाचणी करणा-या संस्थेलाच देते.
7. ज्या नातेवाईकांना आपल्या रुग्णांचे शव मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर रस्त्यांने २४ तासाच्या आत जाता येईल अशा ठिकाणी न्यायचे असते, त्यांना तशी परवानगी दिली जाते.